REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# '' महाराष्ट्र राज्याच्या विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांचे (अधिकोषांचे) योगदान, एक अध्ययन''

डॉ. रेकचंद गणपत गोंगले
सहाय्यक प्राध्यापक , एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी ,
स्नातकोत्तर वाणिज्य विभाग , नबीरा महाविद्यालय, काटोल.

## प्रस्तावना :—

सहकारी चळवळ ही सर्वसामान्याच्या शोषणाविरुद्ध उघडलेली सामुहीक आघाडी होय. म्हणजेच सहकारी चळवळीचा हेतु शोषणमुक्त समाज निर्माण करणे हा होय. समाजातील गरजु आणि दुर्बल घटकांना एकत्रीत करुन संघटनेच्या माध्यमातुन आवश्यक सेवा व उत्पादन हाती घेणे ते 'ना नफा ना तोटा' या तत्वावर चालविणे होय. सहकाराच्या एकमेकांच्या भांडवलाच्या व श्रमाच्या सहायाने प्रत्येक व्यवहार काटकसरीने व आपल्या सभासदांचे व समाजाचे शोषन न करता व स्वत:चा स्वार्थ न साधता विकास करावा ही सहकाराची नैतीक संकल्पना होय. सहकाराने समता, बंधुता, व भेदभाव रहीत समाज रचना निर्माण करणे, समाजातील सर्व स्तरातील लोक जात, धर्म, पंथ, लिंग, इत्यादी बाबी न बघता काहीतरी सहकारी तत्वावर कार्य करण्यास एकत्र येवुन कार्य करणे होय.

महाराष्ट्रात १८७६—७८ या दोन वर्षात प्रचंड दुष्काळ पडला होता. त्याला कंटाळुन मुंबई येथे अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येवुन 'मराठा लॅंड लीग' स्थापन केली. याच्या माध्यामातुन सावकारावर बहिष्कार टाकला गेला. सावकारांची दूकाने जाळणे, कर्जाची कागदपत्रे नष्ट करणे, अशा प्रकारे शेतकऱ्यांनी असंतोष व्यक्त केला. त्यावर ब्रीटीश शासनाने एक चैकशी आयोग नेमला. आयोगाच्या शिफारसीनुसार 'लॅंड कर्झनने' मार्च १९०४ रोजी सहकारी पतसंस्था कायदा मंजुर करुन शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. आणि या कायद्याद्वारे स्वातंत्रपुर्व काळात महाराष्ट्रासह संपुर्ण भारतभर सहकारी चळवळीची सुरुवात झाली. याच कायद्यानुसार सहकारी बॅंक कार्याला सुरुवात झाली. प्रत्यक्षात १९०९ साली 'अकोला' येथे देशातील पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक (अधिकोष) अस्तित्वात आली.

महाराष्ट्रात व्यापारी बॅका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, सहकारी बॅंका, नागरी बॅंका, कृषी वीपणन प्रक्रीया संस्था, दुग्ध व्यवसाय संस्था, गृहनिर्माण संस्था, कृषी व बिगर कृषी सहकारी पतसंस्था कार्य करीत असुन यामध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. सहकारी विकासाच्या बाबतीत भारतातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य सर्वात अग्रेसर आहे. भारतीय सहकारी चळवळीमध्ये गुंतलेल्या खेळत्या भांडवलाच्या १/६ भाग महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा गुंतला आहे. खेळते भांडवल, ठेवी, स्वमालकीचा पैसा, भागभांडवल, सभासदत्व व सहकारी संस्थांची संख्या या सर्वच बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. १९६० मध्ये महाराष्ट्राचे एक भाषिक राज्य स्थापन झाल्यापासुन सहकारी चळवळ वाढली आहे आणि तिच्यात विविधता आलेली आहे.



महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, या पूर्वी कृषी पतपुरवठा क्षेत्रापुरती मर्यादीत होत्या. परंतु कालांतराने ती इतर क्षेत्रामध्ये

जलदगतीने पसरली आहे. या राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात विशेषत: रोजगार निर्मिती आणि सामाजिक बांधिलकी साधण्यात लक्षणिय योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे लोकांच्या गरजा भागविण्यासाठी, व्यवसायी लोकांना त्यांच्या व्यवसायाची वृध्दी होण्यासाठी, नवीन घर बांधण्यासाठी, नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी वित्त (अर्थ) पूरविण्याचे कार्य करीत असते तर समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या व्यक्तिंना सुद्धा ही बॅंक कर्ज देत असते. उदा. हातगाडी लावणाऱ्या व्यक्ती, भाजीपाला विकणारे, रस्त्यावरचे विक्रेते, परीट, लहान प्रमाणावर चर्मोद्योग करणारे, लहान—लहान खेडयामध्ये धंदा करू इच्छिणारे व्यवसायिक इत्यादी, या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका लोकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याकरीता सहकारी पतसंस्थांची निर्मिती केल्या आहेत. या सहकारी पतसंस्था आपल्या सभासदाकडून किंवा नाममात्र सभासदाकडून किंवा इतर लोकांकडुन विविध प्रकारच्या ठेवी गोळा करतात व या ठेवीवर नियमाप्रमाणे तारणावर कर्ज वाटप करतात व त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य करीत असतात.

### संशोधनाची उद्दिष्टये :—

१. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषाचा (बॅंकाचा) अभ्यास करणे.
२. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) सभासदांच्या संख्येत झालेल्या वाढीचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) खेळत्या भांडवलाचा अभ्यास करणे.
४. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) विविध ठेवींचा अभ्यास करणे.
५. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) कर्ज पुरवठयामध्ये झालेल्या वाढीचा अभ्यास करणे.
६. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) येणे कर्ज व थकीत कर्जासंबंधी अभ्यास करणे.

### गृहितकृत्ये (उपकल्पना ) :—

१. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) सभासद संख्येत वाढ झाली आहे.
२. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) ठेवीमध्ये वाढ झाली आहे.
३. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषातील (बॅंकाचा) कर्जपुरवठयात वाढ झाली आहे.

### अभ्यास पध्दती :—

संशोधकाने ''महाराष्ट्र राज्याच्या विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे (अधिकोषाची) योगदान, एक अध्ययन'' हा विषय अभ्यासला असून तथ्य संकलन पध्दतीतील दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. आणि आर्थिक वर्ष संपणाऱ्या मार्च, २०१४ ते मार्च, २०१८ हा कालावधी विचारात घेवून विश्लेषण करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र राज्य :—

महाराष्ट्र राज्य निर्मितीपुर्वी मुंबई राज्य अस्तित्वात होता. याला मुंबई प्रांत संबोधले जात होते. यामध्ये गुजरात, मराठवाडा व विदर्भ हा भाग अंतर्भूत होता. त्यामुळे त्याला द्विभाषीक राज्य असे म्हणत असत. या राज्याचे विभाजन करुन महाराष्ट्र राज्य व गुजरात राज्य असे दोन राज्य निर्माण करण्यात आले. अशाप्रकारे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थपना झाली.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हापासुन मार्च २०१८ पर्यंत या राज्यात ३६ जिल्हे असुन प्रशासकिय कार्यासाठी कोकण, पूणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागामध्ये विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी राज्यात प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थनिक प्रशासणासाठी राज्याच्या ग्रामीण भगात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या, ३५५ तालुके, २७८९६ ग्रामपंचायती, ५३४ शहरे व ४०९५८ वस्ती असलेले खेडे आहेत.

महाराष्ट्र राज्यात जनगणना २०११ नुसार एकुण लोकसंख्या ११२३७४ हजार असुन पुरुष ५८२४३ हजार आहेत तर स्त्रीया ५४१३१ हजार अहेत. लाकसंख्येच्या बाबतीत हे राज्य देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असुन राज्याचे एकुन भौगोलीक क्षेत्र ३.०८ लक्ष चौ.कि.मी. आहे.

**भारतीय सहकारी बँकाची संरचना :—**

आर्थिक स्थिती बाबत एका अर्थशास्त्रज्ञानी असे म्हटले आहे की, ''एखाद्या देशाची आर्थिक स्थिती कशी आहे हे जर जाणुन घ्यायचे असेल तर त्या देशातील बँकांचा अभ्यास करा, ज्या देशातील बँका समृद्ध तो देश समृद्ध असे समजा, या दृष्टीने अभ्यास केला जावा. बँकेचा अभ्यास म्हणजेच पैशाच्या देवाण—घेवानीच्या व्यवहाराचा अभ्यास होय.''

बँकांना अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहीण्या म्हटले आहे. ज्याप्रमाणे माणवी शरीरात रक्तवाहीण्यांना अणन्य साधारण महत्व आहे, त्याचप्रमाणे बँका अर्थव्यवस्थेत जलद विकासाकडे नेत असतात. बँकेमुळे लोकांना बचतीची सवय लागते. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला गती मिळते.

भारतीय सहकारी बँकांची पतपुरवठयाची संरचना त्रिस्तरीय स्वरुपाची आहे.

**भारतीय सहकारी बँकाची संरचना**

↓

राज्य सहकारी बँक

↓

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

↓

प्राथमिक सहकारी पथसंस्था

**राज्य सहकारी बँक :—**

ही बँक राज्य स्तरावर कार्ये करते. सहकारी पतपुरवठा कार्यातील सर्वोच्च बँक म्हणुन या बँकेचा उल्लेख केला जातो. राज्यातील संपुर्ण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या बँकेच्या सभासद असतात. सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे व कारभारात सुसुत्रता आणणे इत्यादी कार्ये करावी लागतात. म्हणुन या बँकेला महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म्हणुन ओळखले जाते. व शिखर बँक म्हणुन सुद्धा संबोधले जाते.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :—**

**व्याख्या:**

**१. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियमानुसार :**

'' जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे अशी बँक की, जी विशिष्ट जिल्हयात स्थापन झालेली असते, जी बँक आपल्या जिल्हयातील सहकारी सस्थांना आपल्या भांडवलाच्या कुवतीप्रमाणे कर्ज देते, अणि सहकारी कायद्याच्या व बँकींग कायद्याच्या चौकटीत राहुन इतर बँकींगचा व्यवहार करते.''

**२. श्री. जे. पी. नियोगी :**

'' जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे अशी बँक की, जी जिल्हयातील इतर सहकारी संस्थाना कर्जे देण्यासाठी निधी गोळा करते, अशी बँक प्राथमिक नागरी बँक नसते.''

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्हा स्तरावर कार्य करते. संबंधित जिल्हा हे या बँकेचे कार्यक्षेत्र असते. म्हणुन या बँकेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असे म्हटले जाते. जिल्हयातील संपुर्ण

प्राथमिक सहकारी पतसंस्था या बँकेच्या सभसद असतात. तसेच सहकारी किसान संस्था, सहकारी ग्रहक संस्था, औध्योगिक सहकारी संस्था, नागरी सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका या बँकेच्या सभासद होउु शकतात. पुर्वी खाजगी व्यक्ती सुद्धा या बँकेचे भागभांडवल खरेदी करुन सभासद होता येत होते. परंतु रिझर्व बँकेच्या धोरणानुसार कोणत्याही व्यक्तिला सभासदत्व दिले जात नाही. ही बँक राज्य सहकारी बँक व प्राथमिक सहकारी पतसंस्था यांच्यातील मध्यस्तीचे कार्य करीत असते. जिल्हयातील प्राथमिक सहकारी पतसंस्थाना आर्थिक मदत करणे, मार्गदर्शन करणे, त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे, व कारभारात सुसुंत्रता आणणे इत्यादी कार्य या बँकेला करावी लागतात.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचे कार्यक्षेत्र :—

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आर्थिक दृष्टया मजबुत व प्रभावशाली होण्याकरीता अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पहाणी समितीने प्रत्येक जिल्हयात केवळ एकच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असावी अशी सुचना केली होती. संपुर्ण जिल्हा हे या बँकेचे कार्यक्षेत्र असते. जिल्हयातील सहकारी चळवळीचा विकास घडवुन आणण्याची जबाबदारी ही बँक पार पाडते.

ग्रामीण आणि सहकारी पतपुरवठयाच्या संदर्भात रिझर्व बँकेने नेमलेल्या उपसमितीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आकारमाणाबद्दल काही निकष सुचविले आहेत ते खालिल प्रमाणे :


१. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका नफा मिळविण्यासाठी कर्ज पुरवठा करीत नसली
तरी आवश्यक तेवढा नफा मिळविण्या इतका बँकेचा आकारमान असला पाहिजे.
२. बँकेने घेतलेल्या भागभांडवलावर किमान लाभांश जाहिर करु शकली पाहिजे.
३. बँकेला स्वत:चा राखीव निधी निर्माण करता आला पीहिजे.

### संघटन व व्यवस्थापन:

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापन चालविण्याकरीता लोकशाही पद्धतीने संचालक मंडळाची निवड केली जाते. यात सामान्यपणे १२ ते १५ व्यक्तिचा संचालक म्हणुन समावेश असतो. प्राथमिक व इतर सहकारी पतसंस्था सभासद असतात. या सभासद संस्थामधुन संचालकांची निवड केली जाते. या संचालकांमधुन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडले जातात. या संचालक मंडळाचा कार्यकाळ पांच वर्षाचा असतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्राथमिक पतसंस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवुन त्यातील दोष दुर करण्याकरीता २० प्राथमिक सहकारी संस्थांवर एक पर्यवेक्षक नियुक्त केला जातो. या पर्यवेक्षकावर संचालक मंडळ नियंत्रण ठेवतो.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ग्रामीण भागात बँक सुविधांचा विस्तार करणे, व्यक्ती व संस्थांकडुन ठेवी स्विकारुण निधी जमा करणे व गरजु व्यक्तिला महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार जिल्हा कार्यक्षेत्रात अल्प व मध्याम मुदतीचा पतपुरवठा करणे, इत्यादी कार्ये ही बँक करते.

## सहकारी पतसंस्थांचे संघटन व व्यवस्थापन संरचना




## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे कार्य :—

| अ. क्र | संस्थांचे प्रकार | ३१ मार्च २०१४ | ३१ मार्च २०१५ | ३१ मार्च २०१६ | ३१ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २ | सभासद (लाखात) | १.७३ | १.८२ | १.९६ | १.९८ | २.०० |
| ३ | खेळते भांडवल (कोटीत) | ७७,७८२ | ८४,५२८ | ९१,४१५ | १,०१,२०५ | १,०४,००६ |
| ४ | ठेवी (कोटीत) | ५७,३७८ | ६१,५२९ | ६६,३८२ | ७१,४२७ | ७५,०९१ |
| ५ | स्थुल कर्ज (कोटीत) | ४०,४६३ | ४४,२३१ | ४३,२६६ | ४३,३६८ | ३६,३२५ |
| ६ | येणे कर्ज (कोटीत) | ४०,३५७ | ४८,१४७ | ४७,४५४ | ४८,९४६ | ५०,९७८ |
| ७ | थकित कर्ज (कोटीत) | ९,९०७ | १०,६७४ | ११,९९९ | १६,१६३ | १४,४३२ |
| | | | | | | |

## विश्लेषण :—

वरील तालीकेवरून महाराष्ट्रात मार्च २०१८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका ३१ असुन त्याच्या उपशाखा ३६६७ आहेत.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांची सभासद संख्या ३१ मार्च २०१४ ला १.७३ लाख होती तर दरवर्षी सभासद संख्येत वाढ होवून ३१ मार्च २०१८ ला २.०० लाख सभासद संख्या आहे. म्हणजेच संबंधीत पाच वर्षात २७ हजार सभासदांची संख्या वाढलेली दिसून येते.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे खेळते भांडवल ३१ मार्च २०१४ ला ७७,७८२ कोटी रूपये असून ते दरवर्शी वाढत जावून ३१ मार्च २०१८ ला १,०४,००६ कोटी रूपये खेळते भांडवल आहे. म्हणजेच संबंधीत पाच वर्षात २६,२२४ कोटी रूपये खेळते भांडवलात वाढ झाल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांच्या विविध ठेवी ३१ मार्च २०१४ ला ५७,३७८ कोटी रूपये असून त्यात दरवर्षी वाढत जावून ३१ मार्च २०१८ ला ७५,०९१ कोटी रूपये विविध ठेवी आहे. यावरून संबंधीत पाच वर्षात १७,७१३ कोटी रूपये वाढ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे स्थूल कर्ज वाटप ३१ मार्च २०१४ ला ४०,४६३ कोटी रूपये होते ते दरवर्शी वाढून ३१ मार्च २०१७ ला ४३,३६८ कोटी रूपये आहे. म्हणजेच संबधीत चार वर्षात २,९०५ कोटी रूपये कर्ज वाटपात वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र ३१ मार्च २०१८ ला ३६,३२५ कोटी रूपये स्थूल कर्ज वाटप करण्यात आले. या वर्षी मात्र कर्ज वाटपात घट झाल्याचे दिसुन येते.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे येणे कर्ज ३१ मार्च २०१४ ला ४०,३५७ कोटी रूपये होते ते दरवर्शी वाढून ३१ मार्च २०१८ ला ५०,९७८ कोटी रूपये आहे. या संबधीत पांच वर्षात १०,६२१ कोटी रूपये येणे कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते. म्हणजेच कर्ज वसुलीत घट झाल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे थकीत कर्ज ३१ मार्च २०१४ ला ९,९०७ कोटी रूपये होते ते दरवर्शी वाढून ३१ मार्च २०१८ ला १४,४३२ कोटी रूपये आहे. म्हणजेच संबधीत पांच वर्षात ४,५२५ कोटी रूपये थकीत कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र सर्वात ज्यास्त ३१ मार्च २०१७ ला १६,१६३ कोटी रूपये थकीत कर्ज आहे. म्हणजेच नोटबंधीमुळे थकीत कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते.

## समारोप :—

३१ मार्च २०१४ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांचे सभासद संख्येमध्ये, खेळत्या भांडवलामध्ये, विविध प्रकारच्या ठेवीमध्ये, विविध प्रकारच्या कर्जपुरवठयामध्ये दरवर्षी वाढ झाल्याचे दिसून आलेले आहे. मात्र थकीत कर्जात वाढ झाल्याचे दिसून आले.

महाराष्ट्राच्या जिल्हयातील संपुर्ण प्राथमिक सहकारी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या सभसद असतात. तसेच सर्व सहकारी संस्था, नागरी सहकारी बॅंका या बॅंकेच्या सभासद होउु शकतात. ही बॅंक राज्य सहकारी बॅंक व प्राथमिक सहकारी पतसंस्था यांच्यातील मध्यस्तीचे कार्य करीत असते. जिल्हयातील प्राथमिक सहकारी पतसंस्थाना आर्थिक मदत करणे, मार्गदर्शन करणे, त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे, व कारभारात सुसुत्रता आणणे इत्यादी कार्य या बॅंकेला करावी लागतात.

महाराष्ट्र राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका या जिल्हयातील नोंदणी केलेल्या सभासदाकडून व इतर व्यक्तिकडून विविध प्रकारच्या ठेवी गोळा करतात. त्यामूळे त्यांना बचतीची सवय सुध्दा लागत असते. याच गोळा झालेल्या ठेविमधून सभासदाला व व्यक्तिला जामिनावर कर्ज वाटप करीत असतात. वाटप केलेल्या कर्जावर उद्योग व व्यवसाय करतात त्यामूळे रोजगार निर्मिती सुध्दा होत असते.

त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका समाजातील सामान्य व आर्थिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या व्यक्तिंना, लहान प्रमाणावर चर्मोद्योग करणारे, रस्त्यावरचे विक्रेते, खेडयामध्ये लहान उध्योग करू इच्छिणारे व्यावसायिक, सामान्य जनता, कारागीर इत्यादी लोकांचा फायदा होवून उन्नती व विकास झालेला दिसून आला आहे. गावाचा विकास तर तालुक्याचा विकास, जिल्हयात विकास आणि राष्ट्राचा विकास म्हणजेच, महाराष्ट्राचा विकास झाल्याचे दिसुन येते. सहकारी विकासाच्या बाबतीत भारतातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य सर्वात अग्रेसर आहे. भारतीय सहकारी चळवळीमध्ये गुंतलेल्या खेळत्या भांडवलाच्या १/६ भाग महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा गुंतला आहे. खेळते भांडवल, ठेवी, स्वमालकीचा पैसा, भागभांडवल, सभासदत्व व सहकारी संस्थांची संख्या या सर्वच बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे.

## संदर्भग्रंथ सूची :—

१. डॉ. दुभाशी पद्माकर रा., भरतीय सहकारी चळवळीच्या शंभर वर्षाचे सिंहावलोकन, सहकारी महाराष्ट्र सहकारी सप्ताह विशेषांक डीसे. २००४.

२. सागर, के, महाराष्ट्रातील जिल्हे, सागर पब्लिकेशन, पूणे
३. गुप्ते, ए.के., ॲडव्होकेट, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १०६० व नियम १९६१, मुकुंद प्रकाशन, ठाणे
४. प्रा. बोरीकर, अशोक., प्रा. कुलकर्णी, पी. आर., भारतीय ग्रामिण अर्थव्यवस्था आणि सहकार, विद्या प्रकाशन, नागपूर.
५. महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी सन ३१ मार्च २०१४ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत.
६. डॉ. कामत,गो.स.,सहकार, व्यवहार आणि व्यवस्थापन, विद्या प्रकाशन, पूणे.
७. www.mscbank.com
८. www.mahrashtra.govt.in



डॉ. रेकचंद गणपत गोंगले
सहाय्यक प्राध्यापक , एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी , स्नातकोत्तर वाणिज्य विभाग , नबीरा महाविद्यालय, काटोल.